# विद्यार्थी-विकास : गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवहारासाठी काही तात्त्विक मीमांसा

विद्यार्थी-विकास हेच खरे तर कुठल्याही शालेय शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट असते . शिक्षणाचे अस्तित्वच मुळी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी असते. याचा व्यत्यास असा की, ज्यातून विद्यार्थी-विकास साधत नाही ते शिक्षणच नव्हे ! या नियमावर आधारित असे आपल्या आजच्या शिक्षणाचे विश्लेषण केले तर आपल्या प्राथमिक शाळांतून, त्यातही सरकारच्या अखत्यारीत असलेल्या शाळांमधून दिले जाते ते 'शिक्षण' म्हणवून घेण्यास कितपत पात्र आहे याची गंभीरपणे शहानिशा होणे अगत्याचे आहे.

'विद्यार्थी-विकास' या संकल्पनेत 'विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' गृहीत धरण्याची प्रथा आहे; आणि ‘सर्वांगीण' विकास म्हणजे, शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक असा सर्वंकष विकास, असे सर्वच शिक्षक ‘बरोबर उत्तर' देतील. परंतु विद्यार्थी-विकास ही संकल्पना सर्वमान्य असली तरी ती सर्वसामान्य, स्थिर अशी संकल्पना नाही; तर ती विशिष्ट वयोमानाशी संबंधित आणि कालानुरूप बदलती अशी संकल्पना आहे.

बालकाचा विकास हा वयोमानाशी, प्रत्येक वयाच्या टप्प्याला होणाऱ्या शारीरिक विकासाशी निबद्ध असतो ही नैसर्गिक घटना आहे आणि तिचा आदर ठेवूनच मुलांच्या विकासाचा सर्वांगीण विचार प्रौढांनी करायचा असतो. मुलांचा टप्प्याटप्प्यांनी होणारा शारीरिक विकास हा त्या त्या वयांत मेंदूमधील होणाऱ्या पेशींच्या परस्पर बांधणीवर अवलंबून असतो, आणि कोणत्या प्रकारचा विकास अधिक वेगाने कोणत्या कालावधीत होतो हेही आता मज्जाशास्त्रातील संशोधनांनी नेमकेपणाने दाखवून दिले आहे.

आपण आपल्या शाळांमधून विद्यार्थ्यांच्या 'बौद्धिक विकासावर भर देणार असू तर आपल्याला मानसशास्त्रातील, बौद्धिक विकास हा शारीरिक विकासावर अवलंबून असतो हा ज्ञानग्रहणाचा शरीरवैज्ञानिक सिद्धांत माहीत असायला हवा; तसेच मेंदूविकसनानुसार शारीरिक व बौद्धिक विकासाचे टप्पे ठरत असतात हा मज्जाशास्त्रीय सिद्धांतही जाणून घ्यायला हवा.

मेंदूचा विकास - शारीरिक विकास + बौद्धिक विकास अशी ही विकासमालिका लक्षात घेऊनच आता शालेय शिक्षणाची - त्यातील अभ्यासक्रमाची, अभ्यासक्रम पार पाडण्याच्या पद्धतींची आणि त्यानुसार करावयाच्या शैक्षणिक व्यवस्थाची व वातावरणाची आखणी करायला हवी.

**मेंदूचा विकास**

बालक जन्माला येते तेव्हा, मेंदूमधील अक्षरश: अब्जावधी पेशी, मेंदूमधील आपापली कायमस्वरूपी जागा घेऊन, पुढील विकासासाठी सज्ज असतात. कर्मेंद्रिये आणि ज्ञानेंद्रिये यांच्याकरवी जसजसे अनुभव प्राप्त होत जातात तसतशी मज्जापेशींची जुळणी होत जाते. ॲक्झॉन्सवर मायेलीनचे थर बसून पेशींचे कार्य सबल होते; तसेच पेशीपेशींमधील विदर रासायनिक द्रावाने भरले जाऊन पेशींना परस्पर संवादाची सोय प्राप्त होते. मेंदू सजग आणि कार्यरत होणे हे सर्वस्वी या मेंदूअंतर्गत घटनांवर अवलंबून असते. साधारणपणे वयाच्या आठव्या वर्षांपर्यंत हे पेशीबांधणीचे म्हणजेच मेंदूघडणीचे कार्य पूर्णतेच्या जवळ जाते. मेंदूचा कपाळावरील भाग हे विचार कार्याचे स्थान असून त्याच्या संदर्भातील मेंदूघडणीचे कार्य, जवळजवळ चौदाव्या वर्षांपर्यंत पूर्णतेकडे जाते. या सगळया घटनांचे शैक्षणिक पर्यवसान असे की मुलाच्या विकासाच्या संदर्भात तीन टप्पे ठळकपणे वेगळे करता येतात. पहिला टप्पा आठ वर्षांपर्यंतचा, दुसरा चौदा वर्षांपर्यंतचा आणि तिसरा त्यानंतरचा.

**शारीरिक विकास**

कर्मेंद्रियांची सततची हालचाल आणि ज्ञानेंद्रियांचा सततचा वापर यांच्या सहाय्याने लहान वयांतील मेंदूतील क्षमतांचा विकास साधत असतो; तद्वतच, मेंदूबांधाणीच्या कार्याने शारीरिक अवयवांच्या क्षमतांची वाट मोकळी होते. हा परस्परसंबंध लक्षात घेतला तर, शारीरिक हालचाल हा लहान मुलांचा स्थायीभाव का असतो हे ध्यानात येईल. (एक मिनिट काही 'हा' स्वस्थ बसत नाही !)

साधारणपणे वयाच्या दीड वर्षांनंतर मुलांना कंठ फुटतो; आणि मग बोलणे, सतत बोलणे, बोलून भाषाक्षमता वाढवणे, आणि वाढत्या भाषाक्षमतेचा वापर करून भाषासमृद्धी साध्य करणे याची दिशा मुले पकडतात. ऐकून आणि बोलून भाषा शिकण्याच्या वयांत (साधारणपणे दीड ते सात-आठ या वयांत) मुलांना मोठ्या प्रमाणावर ऐकायला आणि बोलायला प्रोत्साहन मिळावे लागते. (वर्गात कुणीही बोलायचं नाही ! हाताची घडी तोंडावर बोट !!)

बालकांच्या स्नायूंचा विकास टप्प्याटप्याने होत जातो. मात्र त्या त्या वेळी त्यांच्या विकासाचा जाणीवपूर्वक सराव द्यावा लागतो. असा सराव करण्याची प्रेरणा बालकाला उपजत असते; मात्र ती ओळखून, बालकाच्या उपजत सरावाला अडथळा, विरोध होऊ नये ही काळजी प्रौढांनी घ्यायची असते. विकासक मानसशास्त्र (डिव्हलपमेंटल सायकॉलॉजी), आज, बालकाच्या विकासाच्या टप्प्यांचे नेमकेपणाने आणि बारकाव्याने वर्णन करू शकते. त्यामुळे बालक समजावून घेण्यासाठी त्याचा चांगला उपयोग आपण करू शकतो. एवढेच नव्हे तर, याचा दैनंदिन घरगुती व्यवहारांत आणि शालेय व्यवहारात यांतून मिळालेल्या सूचना उपयुक्त ठरतात. उदाहरणार्थ, बालकाच्या प्रत्येक विकासकृतीला त्या त्या वेळेस उत्तेजन व अवकाश दिला गेला नाही तर विकासाला विलंब लागण्याची, विकास मंदावण्याची शक्यता असते. याउलट जागरुकतेने पाहिल्यास मुलांच्या विकासाच्या विशिष्ट टप्प्याची चाहूल लागण्यापूर्वीच त्यांची तयारी आगाऊ करून ठेवणे शक्य होते.

शिक्षक मुलांच्या विकासटप्प्यांना ओळखून त्यानुसार अनेक संधी शालेय विद्यार्थ्यांना देऊ शकतात, याचबरोबर कोणत्या टप्प्याला मुला-मुलीकडून काय अपेक्षित आहे आणि काय अपेक्षित नाही याची ही समज पक्की होते. विशिष्ट वयाला जे अपेक्षित आहे, तेवढे आणि तेवढेच घडण्यासाठी उत्तेजन देणे रास्त असते. त्यापेक्षा कमी संधी दिल्या तर विद्यार्थ्यांच्या क्षमतांना पुरेसा न्याय दिला जात नाही; त्यांच्या क्षमता पुरेशा फुलत नाहीत. याउलट, मुलांकडून अधिक अपेक्षा करीत राहिल्यास, आपण तिथपर्यंत पोचू शकत नाही या विचारापोटी मुलांना नैराश्य येते. शिक्षणाच्या बाबतीत, बऱ्याचदा हा अनुभव येतो की, आपण शिक्षकांच्या अपेक्षांपर्यंत पोचू शकत नाही, हे पुन्हा पुन्हा शिक्षकांनी दाखवून दिल्यास विद्यार्थी प्रयत्नांकडेच पाठ फिरवितात. त्यासंबंधी निराशाग्रस्त होतात; कायमचे दूरजातात.

**बौद्धिक विकास**

बालकाच्या बौद्धिक विकासाचे ही अपेक्षित असे टप्पे असतात. प्रत्येक टप्प्याला बौद्धिकतेचा एक आकृतिबंध (पॅटर्न) कल्पता येतो. हा आकृतिबंध, त्या त्या वेळची मेंदूमधील पेशींची संरचना, शारीरिक परिपक्कता आणि शिकण्याचे प्रयत्न यांवरून ठरत असतो. मुलीला काय समजते आहे, कितपत समजते आहे आणि, नेमकी समज कशाप्रकारची आली आहे याचे सूचन हा आकृतिबंध करीत असतो. बाह्य जगातील वेगवेगळया वस्तू, व्यक्ती आणि घटना यांबाबतचे ज्ञानग्रहण मुले करीत जातात. प्रत्येक वेळी अशा अनुभवांतून आलेल्या प्रतिमा मुलांच्या मनांवर उमटत राहतात, टिकून राहतात. अशाप्रकारे बाह्य जगातील सर्व प्रकारच्या संकल्पना, मुले, आत्मसात करीत जातात. या संकल्पना किती नेटकेपणाने आत्मसात झाल्या आहेत यावर, व्यक्तीची बौद्धिक ताकद अवलंबून असते. त्यामुळे, ज्ञानाच्या संकल्पना नेटकेपणाने तयार होत जाणे हेच खरे शिकणे होय. हे घडण्यासाठी, तीन प्रकारच्या (बालकांच्या) गरजांचा उल्लेख मानसशास्त्रज्ञ करतात.

एक, मुलांची, परस्पर संबंध बांधण्याची क्षमता विकसित व्हायला हवी. नव्या अनुभवांची आधीच्या अनुभवांशी संबंध जोडणे, नव्या शिकलेल्या संकल्पना आपल्या दैनंदिन जीवनातील वस्तू-व्यक्ती-घटनांशी जोडणे, यांमधून संकल्पनांचे ज्ञान पक्के होते.

दोन, शिकत असलेल्या संकल्पनांचा आशय आत्मसात व्हायला हवा. यासाठी कर्मेंद्रिय नि ज्ञानेंद्रिय निरोगी अवस्थेत असणे, सजग असणे, हातांनी 'करून' शिकणे, चित्र नाट्य, खेळ या माध्यमांचा वापर करून शिकणे, वरच्या वयाला वाचून आशय समजावून घेणे आणि जिज्ञासेला परिपूर्ण वाव मिळून सतत प्रश्न उपस्थित करणे नि त्यांतील सोडवणुकीचा शोध घेणे, अशा प्रकारच्या क्रियांमधून मुले संकल्पनांचे ज्ञानग्रहण करतात.

अलीकडे, मानसशास्त्रज्ञ, बहुविधा बुद्धिमत्तांचा विचार ग्राह्य धरतात. त्यानुसार, मुले आपल्याला प्राप्त अशा प्रकारच्या बुद्धिमत्तांच्या आधारे आशय समजावून घेत असतात.

तीन, मुलांची तार्किकता विकसित व्हायला हवी. तर्क करता येणे ही खूप महत्त्वाची अशी बौद्धिक क्षमता आहे. मात्र ही तार्किकता मुलांमध्ये विकसित होण्यासाठी मोठा कालावधी लागतो. त्यातही मुख्य भेद आहे तो तार्किकतेच्या स्वरूपाचा. मानसशास्त्रज्ञ दाखवून देतात की, मुलांची तार्किकता ही प्रौढांच्या तार्किकतेपेक्षा गुणात्मकदृष्ट्या भिन्न असते. याचा अर्थ असा की, लहान मुलांकडून प्रौढांच्या तार्किकतेची अपेक्षा करू नये. हळूहळू बौद्धिक कार्ये करीत असताना मुले वाढत्या वयात, साधारणपणे कपाळावरील मेंदूचा भाग विकसित होतो त्या सुमारास चौदा-पंधराव्या वर्षापर्यंत प्रौढांच्या तार्किकतेकडे वळतातच. याच वयात मुले मूर्त विचारांकडून अमूर्त विचारांकडेही वळलेली असतात. शाळांमधून असे अमूर्त विचारांकडे नेणारे अनुभव मुलांना भरपूर प्रमाणात मिळाले, नवनव्या कल्पना लढवायला मिळाल्या, गुंतागुंतीच्या अनुभवांचे विश्लेषण करण्याचे अनुभव मिळत गेले. तर मुले आवश्यक अशा अमूर्त विचारांकडे लवकर व प्रभावी रीतीने वळतात.

**सामाजिक व भावनिक विकास**

सर्वांगीण विकासाच्या संकल्पनेत, इतर विकास पैलूंबरोबरच, मुलांच्या भावनिक आणि सामाजिक विकासाचा अंतर्भाव केला जातो. प्रत्येकच व्यक्ती जन्मतःच एका समाजाचा, एका संस्कृतीचा घटक म्हणूनही जन्म घेत असते. त्यामुळे, एका अर्थाने 'शिकणे म्हणजे संस्कृतीशी जोडून घेणेच असते. शिकण्याची नैसर्गिक प्रक्रियाही समाजसंपर्कानेच कार्यरत होते. शिकण्याच्या पद्धती, शिकण्याचा आशय, अभिव्यक्तीच्या रीती यांच्यावरही विविध सांस्कृतिक-सामाजिक घटकांचा प्रभाव पडत असतो. उदाहरणार्थ, भाषा आत्मसात करण्याची, म्हणजेच भाषा समजण्याची आणि बोलण्याची क्षमता दर्शविणारी केंद्रे मेंदूमध्ये उपजतरीत्या असली तरी, भाषेची व्यक्तिगत पातळीवरील निर्मिती ही केवळ समाजभाषा-संपर्कातूनच होते, हे निर्विवाद सत्य आहे. जे भाषेबाबत तेच सामाजिक मूल्यांबाबतही खरे आहे. या सांस्कृतिक परिसरात मुले जन्मतात आणि पहिली काही वर्षे वाढतात त्या परिसरातील भाषा, मूल्ये ती आत्मसात करतात. एवढेच नव्हे तर, संकल्पना, त्यांचा आशय आणि एकूणच अर्थात्मकतेचा शोध मुले परिसराच्या वातावरणांतूनच घेत असतात. त्यामुळे, या नजिकच्या परिसराशी मुलांचे जीवन बांधलेले असते त्या परिसरात शिक्षणाभिमुख शिक्षणनिर्मितीचे दोन मार्ग आहेत. तसेच, व्यक्तीचा एक व्यक्ती म्हणून होणारा स्वयंविकास आणि व्यक्तीचा एक समाजघटक म्हणून होणारा विकास ही शिक्षणाची दोन व्यापक उद्दिष्टे म्हणून समोर ठेवता येतात.

व्यक्तीच्या भावनिक विकासाचे महत्त्व असते ते व्यक्ती ही कायम समाजसंपर्कात जीवन व्यतित करीत असते म्हणून. त्यासाठी, याचे वर्णन आज 'भावनिक बुद्धिमत्ता' असे मानसशास्त्रीय क्षेत्रात केले जाते, त्या बुद्धिमत्तेची जोपासना शालेय वयापासून करणे हे चांगल्या नागरिकत्वाच्या पोषणासाठी आवश्यक ठरते. सहकाराने

दुसऱ्यांशी जुळवून घेता येणे आणि वेळप्रसंगी संयम आणि नियंत्रणाची कास धरता येणे ही शिक्षणाची नवी उद्दिष्टे म्हणून शालेय शिक्षणात अंतर्भूत करता येतील.

**शिक्षणाचा पाया : शास्त्राधार**

गेल्या तीस-पस्तीस वर्षांमध्ये, संगणकीय तंत्रज्ञानाच्या क्रांतिकारी प्रगतीमुळे शास्त्रांच्या क्षेत्रांत- विशेषतः शास्त्रसंशोधनांच्या क्षेत्रांत चैतन्याचे वातावरण पसरले आहे. आपल्या प्रत्ययाला येणारे आरोग्यक्षेत्रातले नवनवे शोध हा याच चैतन्यमयी वातावरणाचा परिपाक आहे. अनेक शास्त्रांमधील संशोधनांना वेग आला आहे, त्यांतून विविधांगी नवे निष्कर्ष हाती येत आहेत. यांमधील निवडक अशा शिक्षणक्षेत्राशी संबंधित किंवा शिक्षणावर मूलभूत परिणाम करू शकतील अशा शास्त्रसंशोधनांबाबतची एक नवी घटना, शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवी.

आजवर, म्हणजे संपूर्णपणे विसाव्या शतकात, प्रामुख्याने 'मानसशास्त्र' हाच शिक्षणाचा पाया मानला जात होता. हे मानसशास्त्र म्हणजे 'वर्तनवादी मानसशास्त्र' (बिहेवियरल सायकॉलॉजी) होय. सर्व शिक्षणव्यवस्था  त्यातील तत्त्वांच्या आधारावर आखल्या गेल्या आहेत. व्यवहारात मात्र, या शिक्षणव्यवस्था काही थोड्यांना यशस्वी नि अनेकांना अयशस्वी ठरवताहेत; सर्वांच्या बुद्धिमत्तांना न्याय देण्याची नि त्या विकसित करायला अपुरी ठरणारी अशी ही व्यवस्था आहे, आणि एकूणच त्याचा शास्त्रीय पाया कमकुवत आहे या बाबी ठळकपणे, अनुभवांतून पुढे आल्या आहेत. त्यामुळे शिक्षणाचा हा विशिष्ट शास्त्राधार दूर करण्याची मोहीमच जगभर वेग घेत आहे. आपण यात आहोत का, याचा विचार गंभीरपणे करायला हवा.

गेल्या काही वर्षांतील विविध शास्त्रांमधील प्रगतीतून, पूर्वीच्या या शिक्षणाच्या शास्त्रीय आधाराचा नवा शास्त्राधार पर्याय म्हणून उभा राहिला आहे.

तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, मानववंशशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्तेचे शास्त्र आणि मुख्य म्हणजे मज्जाशास्त्र (विसाव्या शतकाचे अखेरचे दशक मेंदूसंशोधनाचे दशक म्हणून ओळखले जाते!) या सर्व शास्त्रांमधून, माणूस शिकतो कसा ? मुले ज्ञानग्रहण कसे करतात ? अशा दिशेने उद्भवणाऱ्या जुन्याच प्रश्नांना नवीन उत्तरे सापडत आहेत.

या सर्व शास्त्रांमधील संशोधनांचा ‘मूल शिकते कसे' याच्याशी संबंधित असलेला भाग एकत्र येऊन त्याने नव्या 'आकलनविषयक शास्त्राची (कॉग्निटिव्ह सायन्स) निर्मिती केली आहे; आणि खऱ्या नि उपयुक्त अर्थाने इथून पुढे शिक्षणाचा पाया म्हणून हे आकलनविषयक शास्त्र गणले जाणार आहे. शिक्षणाचा हा नवा शास्त्राधार, शिक्षणाची मेंदू आधारित शिक्षणाची नवी तत्त्वे आपल्यासमोर ठेवतो. या तत्त्वांच्या आधारे नवी शिक्षणपद्धती आपल्यापुढे ठेवतो. या नव्या शिक्षणपद्धतीला 'रचनात्मक शिक्षणपद्धती' (कन्स्ट्रक्टिविझम) असे म्हणतात.

**रचनात्मक शिक्षणपद्धती**

रचनात्मक शिक्षणाचा विचार हा केवळ सैद्धांतिक अथवा तात्त्विक मीमांसा मांडणारा विचार नाही. तो अधिक शास्त्रीयतेच्या आधारे शिक्षणाचा प्रत्यक्ष व्यवहार सांगणारा, मुलांच्या विकासाच्या अंगाने शिक्षणव्यवहार घाडविण्याची पद्धत देणारा असा विचार आहे. शास्त्रांनी सिद्ध केलेल्या, जगाविषयीची आपली धारणा, अनुभवधारे आपली आपणच घडवत असतो, या गृहितावर आधारित असा हा नवविचार आहे. विद्यार्थ्यांपुढे सतत ज्ञानग्रहणाची नवनवीन आव्हाने ठेवून, गुंतागुंतीच्या प्रश्न सोडवणुकीच्या स्थितीत, त्यांची शैक्षणिक तयारी करवून घेण्यावर हा व्यावहारिक विचार, प्रामुख्याने भर देतो. मेंदू हा शिकण्याचा अवयव आहे आणि मेंदू प्रत्यक्ष करून, स्वानुभवाने अर्थशोधन करून शिकत असतो. ही मज्जामानसशास्त्रातील (न्युरोसायकॉलॉजी) निष्कर्षांची जोड रचनावादी शिक्षणविचाराला मिळाली आहे. मानवी मेंदू हा सातत्याने अर्थात्मकतेचा शोध घेत असतो. (सर्चिंग फॉर मिनिंग), त्यासाठी परस्परसंबंधांचा शोध घेऊन (सिकिंग कनेक्शन्स), काही आकृतिबंध (सिकिंग पॅटर्नस्)-मानसप्रतिमा (मेंटल इमेजेस्) तयार करीत असतो, अशी ज्ञानग्रहणाच्या प्रक्रियेची दिशा मेंदू संशोधनाने आपल्यापुढे ठेवली आहे. प्रत्यक्ष मुलांच्या शिकण्याच्या संदर्भात आणखी काही उपयुक्त माहितीही आपल्या हाती लागली आहे. उदा. लहान वयांत मेंदू वेगाने घडत जातो, नव्या वातावरणाशी जुळवून घोतो, गरजेनुसार बदलतो (प्लास्टिसिटी), विकास पावत जातो; तसेच धाक, भीती, ताण यांमुळे मेंदूवर विपरित परिणाम होतो इत्यादी.

या साऱ्या संशोधित संचितामधून शिकण्या-शिकविण्याच्या व्यवहाराला लागू पडतील अशी काही, रचनात्मक शिक्षणाच्या दिशेने नेणारी तत्त्वे उपलब्ध होतात. उदाहरणार्थ,

* मुलांना, त्यांचा त्यांनाच अर्थाचा शोध घोऊ दिला तर शिक्षण  परिणामकारक होते.

* सर्व ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये वापरून शिकू दिल्यासच  मेंदू अधिक सक्षम होतो, आणि मग शिकणेही परिणामकारक होते.

* मेंदूपूरक वातावरणनिर्मितीमुळे मेंदूची परस्परसंबंध बांधण्याची-अन्वय लावण्याची क्षमता व नवीन माहिती लक्षात ठेवण्याची क्षमता वाढते.

* तुकड्यांत विभागून देण्यापेक्षा मूलभूत संकल्पनांवर लक्ष केंद्रित करून, त्या अंतर्गत परस्पर संबंधा शोधण्याचा अवसर दिल्यास व एकात्मतेने माहिती पुढे ठेवल्यास, (प्रकल्प तंत्राच्या वापरात असे घडून येते !) मुले, अर्थशोध घेणे व आकृतिबंध पाहणे या गोष्टी प्रभावीपणे करतात तेथे शिकणे परिणामकारकरीतीने होते.

* विविध बुद्धिमत्तांचा वापर करण्यासाठी तसेच शिकण्याच्या विविध शैलींचा वापर करण्यासाठी मुलांना प्रवृत्त केल्यास त्यांचे व्यक्तिगत शिक्षण चांगले होते.

मुलांना विचार करायला, कल्पना करायला उद्युक्त करणे, कार्य-कारणसंबंध शोधायला लावणे हीच शिकविण्याची उत्तम पद्धत आहे.

या तत्त्वांना समोर ठेवून प्रत्यक्ष वर्गांमधून राबविण्याचे उपक्रम तयार करता येतात. अनेक उपक्रमशील शाळांनी (महाराष्ट्रातदेखील) असे उपक्रमांचे भांडार निर्माण केले आहे. शिक्षणाचा विकासाभिमुख व्यवहार शिक्षणाच्या विकासाभिमुख व्यवहार-तत्त्वांची मांडणी आपण पुढीलप्रमाणे करू शकू :

१. मूल शिकते कसे यांविषयीची आकलनशास्त्राने पुढे ठेवलेली नैसर्गिक विकासाची तत्त्वे समोर ठेवून, त्यांना अनुसरून शिक्षण करावे. मूल आपले आपण शिकते, मूल अनुभवांतून आणि कृतिशील अनुभवांतून विशेषत्वाने शिकते, आपली सर्व ज्ञानेंद्रिये नि कर्मेंद्रिये यांना सजग करून शिकते, साधने, साहित्य, कला अशा मूर्त-अमूर्त बाबींची वयानुरूप मांडणी करून मुलांना परिपूर्णतेने शिकते करता येणे.
२. प्रत्येक विद्यार्थ्याच्या सबलता, निर्बलता, बुद्धिमत्ता, स्वभाववैशिष्टे, कल, रस, गरजा यांना अनुसरूनच वैयक्तिक शिक्षण दिले जावे. कारण, शिक्षण हे नेहमीच व्यक्तिगत असते आणि व्यक्तीच्या वेगळेपणाचाही सन्मान ठेवायचा असतो.
३. परिसरातील सामाजिक-सांस्कृतिक कोंदणातच विद्यार्थी शिकत असतात, हे ध्यानात घेऊन शिक्षणातील आशय परिसरांतून उचलणे किंवा परिसराशी जोडणे गरजेचे असते. तसेच शिक्षण हे अर्थपूर्ण असेल तरच विद्यार्थ्यांची अर्थशोधन प्रक्रिया फलद्रूप होते हे लक्षात घेऊन शिक्षणाचा आशय मांडता आला पाहिजे.

विद्यार्थी-विकासाला अनुसरून शिकण्या-शिकविण्याचा व्यवहार शाळांमधून आणि शाळांच्या वर्गांमधून घाडून येणे ही शालेय शिक्षणाला गुणवत्तेकडे नेणारी पहिली पायरी आहे. त्यासाठी रचनात्मक शिक्षणाकडे वळणे अपरिहार्य आहे याची जाण २००५ सालच्या एन्. सी. ई. आर्. टी. या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात (नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क) दिलेली आहे. शिक्षण शाळेबाहेरच्या जीवनाशी जोडणे, शिक्षण घोकमपट्टीच्या बाहेर काढणे, क्रमिक पुस्तकांच्या पलीकडे अभ्यासक्रमाला नेणे किंवा परीक्षा प्रकरण सैल करून त्याला (नव्याने निर्माण झालेल्या) वर्गातील जीवनाशी जोडणे अशा कितीतरी उपयुक्त दिशा या आराखड्यात सुचविलेल्या आहेत. सार्वत्रिकरित्या त्यांचा स्वीकार, अवलंब, त्याआधारे मूल्यमापन अशा गोष्टींची आखणी त्वरेने करणे अगत्याचे ठरेल.

❖